Please purchase PDFcamp Printer on http://www.verypdf.com/ to remove this watermark.

## शेतक-यांचे अभ्यास दौरे (राज्यांतर्गत) आयोजित करणे

प्रस्तावना

पशुसंवर्धनाच्या माध्यमातून शेतकरी पशुपालकांचा आर्थिक विकास साध्य करण्यासाठी त्यांचे अभ्यास दौरे आयोजित करणे अत्यंत आवश्यक आहे. एखादी यशोगाथा प्रत्यक्ष डोळ्याने पाहिल्यानंतर शेतक-यांचा त्याव
यशोगाथांची पुनरावृत्ती होऊ शकते. महाराष्ट्र कृषी स्पर्धात्मक विकास प्रकल्पांतर्गत प्रकल्प अंमलबजावणीच्या सर्व १८ जिल्हयांतील शेतक-यांसाठी अभ्यास दौ-याचे नियोजन करण्यात यावे. प्रकल्प कालावधीत एकूण १२०० शेतक-यांना २० जणांच्या गटात अभ्यास दौ-याचे नियोजन करण्यात यावे. प्रकल्पांतर्गत २४ (२० मोठ्या जनावरांचे व ४ शेळी मेंढी चे बाजार)च्या लाभ क्षेत्रातून प्रति बाजार ५० शेतकरी या प्रमाणे १२०० शेतक-यांचे दौ-याचे आयोजन करण्यांत यावे.

कार्यक्षेत्र

महाराष्ट्र कृषी स्पर्धाक्षम विकास प्रकल्पांतर्गत प्रकल्पाच्या १८ जिल्हयातील शेतकरी / पशुपालक अभ्यास दौ-यासाठी पात्र राहतील. प्रतिवर्षी ३० शेतक-यांचे आठ गट या प्रमाणे प्रकल्प कालावधीत एकूण १२०० शेतक-यांना या उपघटकाचा लाभ देण्यात यावा.

उपघटकाचे स्वरूप

राज्यांतर्गत शेतकरी अभ्यास दौ-याचे नियोजन संबंधित जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त यांनी करावे. शेतक-यांची निवड पशुधन विकास अधिकारी (विस्तार) यांनी तालुका पातळीवर करावे व त्यानुसार शेतक-याचा अर्ज, अभ्यास दौ-यात सहभागी होण्याच्या संमती पत्रासहीत जिल्हा निवड समितीकडे सादर करावा. जिल्हा निवड समितीने निवड केलेल्या ३० जणांच्या गटाच्या अभ्यास दौ-याचे नियोजन व अंमलबजावणी जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त व जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी यांनी संयुक्तरित्या करावी.

अभ्यास दौ-यामध्ये पशुपालकांच्या राज्यातील यशोगाथा, आदर्श व्यवस्थापन, जनावरांचे बाजार, पशुसंवर्धनाच्या नवीन तंत्रज्ञान अवलंबलेल्या प्रगत संस्थेला भेट, संशोधन संस्थेला भेट इत्यादी बाबीचा समावेश करावा. अभ्यास दौ-या अंती सहभागी शेतक-यांकडून त्यांचे अनुभव कथन लेखी स्वरूपात घेण्यात यावे तसेच सीडी, डिव्हीडी स्वरूपात माहिती जतन करावी.

शेतक-यांची निवड

या अभ्यास दौ-यासाठी शेतकरी / पशुपालकांची निवड तालुका पातळीवर संबंधित पशुधन विकास अधिकारी - विस्तार यांनी करावी.

निवडीचे निकष

अभ्यास दौ-यासाठी पशुपालकांची निवड करताना निवडीचे निकष खालीलप्रमाणे राहतील.

१) निवडलेल्या शेतक-यांकडे दुधाळ जनावरे/कुक्कुट/ पक्षी असणे अत्यावश्यक आहे.
२) पुरस्कार प्राप्त पशुपालकांना प्राधान्य देण्यात यावे
३) शेतक-यांकडून अभ्यास दौ-यासाठी संमती पत्र घेणे बंधनकारक आहे.
४) शेतक-यांचा वयोगट २१ वर्षे ते ५० वर्ष इतका असावा.
५) बचत गटांच्या (पशुसंवर्धन) सदस्यांना पुरेसे प्रतिनिधीत्व / प्राधान्य देण्यात यावे.
६) अन्य शेतकऱ्यांना मार्गदर्शन / अनुभव कथन करण्याची क्षमता असावी.

शेतकरी / पशुपालकांची निवड जिल्हास्तरीय समितीद्वारे करण्यात यावी.(जिल्हास्तरीय जनावरांचे स्वास्थ शिबीर निवड समिती)

उपघटकाचे अंदाजपत्रक

या उपघटकाच्या अंमलबजावणीसाठी निधी संबधित जिल्हयाच्या आत्मा यंत्रणेमार्फ त धनाकर्षाव्दारे /धनादेशाव्दारे जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त यांच्याकडे उपलब्ध होणार आहे. या अभ्यास दौ-यासाठीची अंदाजपत्रकीय तरतूद खालील प्रमाणे आहे. ३० शेतक-यांच्या एका गटासाठी रू. ४५,०००/- इतकी कमाल तरतूद आहे. यामध्ये प्रवास खर्च जेवण व मुक्काम यांचा समावेश आहे. यानुसार प्रकल्प कालावधीत एकुण ४० गटांच्या अभ्यास दौ-यांचे आयोजन करण्यासाठी रू. १८.०० लाख तरतूद केली आहे.

Please purchase PDFcamp Printer on http://www.verypdf.com/ to remove this watermark.

जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त यांनी दौ-याचे व्यवस्थीत नियोजन करून मगच शेतक-यांना जबाबदार अधिका-यासह दौ-यावर पाठवावे.

उपघटकाचे संनियंत्रण

तालुका पातळीवर शेतक-यांचे निवड अर्ज पशुधन विकास अधिकारी, पंचायत समिती (विस्तार) यांचे शिफारशीसह जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त यांचेकडे पाठवून निवड करण्यात यावी. निवडलेल्या शेतक-यास जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त यांनी पशुधन विकास अधिकारी पंचायत समिती विस्तार यांच्यामार्फत नियोजित केलेल्या अभ्यास दौ-यासाठी अवगत करावे. जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त व जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी यांनी या उपघटकाचे संनियंत्रण करावे.

फलनिष्पत्ती

या अभ्यास दौ-यामुळे शेतकरी/ पशुपालकांना विविध बाजार व्यवस्थापन संस्था नवीन तंत्रज्ञान अवलंबलेल्या संस्थांना भेटी दिल्यामुळे अनुभवात भर पडेल. बाजार विषयक ज्ञानात भर पडेल नवीन बदलास स्विकारण्याची मानसिकता निर्माण होईल व इतरांना या ज्ञानाचा फायदा अनुभव कथनाव्दारे होईल.

Please purchase PDFcamp Printer on http://www.verypdf.com/ to remove this watermark.

## शेतक-यांचे अभ्यास दौरे (राज्यातंर्गत) आयोजित करणे - वर्षनिहाय / जिल्हावार भौतिक उद्दिष्टांचे विवरण

| अ. क्र. | मोठया जनावरांचे बाजार (गाय + म्हैस) | | एकुण भौतिक उद्दिष्ट | २०११-१२ | २०१२-१३ | २०१३-१४ | २०१४-१५ | २०१५-१६ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | बाजाराचे नाव | जिल्हा | | | | | | |
| १ | चांदुर बाजार | अमरावती | ५० | १० | १० | १० | १० | १० |
| २ | करंजा | वाशिम | ५० | १० | १० | १० | १० | १० |
| ३ | पुसद | यवतमाळ | ५० | १० | १० | १० | १० | १० |
| ४ | मेहकर | बुलढाणा | ५० | १० | १० | १० | १० | १० |
| ५ | नेवासा | अहमदनगर | ५० | १० | १० | १० | १० | १० |
| ६ | कर्जत (शेळी मेंढी बाजार) | अहमदनगर | ५० | १० | १० | १० | १० | १० |
| | टप्पा १ एकूण | | ३०० | ६० | ६० | ६० | ६० | ६० |
| ७ | सावनेर | नागपुर | ५० | ० | ५ | १५ | १५ | १५ |
| ८ | लाखनी | भंडारा | ५० | ० | ५ | १५ | १५ | १५ |
| ९ | आमगाव | गोंदिया | ५० | ० | ५ | १५ | १५ | १५ |
| १० | कडा | बीड | ५० | ० | ५ | १५ | १५ | १५ |
| ११ | सांगोला | सोलापुर | ५० | ० | ५ | १५ | १५ | १५ |
| १२ | अकलुज | सोलापुर | ५० | ० | ५ | १५ | १५ | १५ |
| | टप्पा २ एकूण | | ३०० | ० | ३० | ९० | ९० | ९० |
| १३ | पिंपळगाव बसवंत | नाशिक | ५० | ० | ० | ० | २५ | २५ |
| १४ | पाचोरा | जळगाव | ५० | ० | ० | ० | २५ | २५ |
| १५ | अंमळनेर | जळगाव | ५० | ० | ० | ० | २५ | २५ |
| १६ | शिरपुर | धुळे | ५० | ० | ० | ० | २५ | २५ |
| १७ | वसई | ठाणे | ५० | ० | ० | ० | २५ | २५ |
| १८ | खेड | पुणे | ५० | ० | ० | ० | २५ | २५ |
| १९ | लोणंद | सातारा | ५० | ० | ० | ० | २५ | २५ |
| २० | सांगली | सांगली | ५० | ० | ० | ० | २५ | २५ |
| २१ | वडगाव पेठ | कोल्हापुर | ५० | ० | ० | ० | २५ | २५ |
| २२ | आटपाडी (शेळी मेंढी बाजार) | सांगली | ५० | ० | ० | ० | २५ | २५ |
| २३ | दौंड (शेळी मेंढी बाजार) | पुणे | ५० | ० | ० | ० | २५ | २५ |
| २४ | दहीवडी (शेळी मेंढी बाजार) | सातारा | ५० | ० | ० | ० | २५ | २५ |
| | टप्पा ३ एकूण | | ६०० | ० | ० | ० | ३०० | ३०० |
| | एकुण | | १२०० | ६० | ९० | १५० | ४५० | ४५० |